**जिल्हास्तरीय दुष्काळ देखरेख समिती व चारा डेपो व्यवस्थापन जिल्हास्तरीय समिती या दोन्ही समितीचे एकत्रीकरण करून "जिल्हास्तरीय दुष्काळ व्यवस्थापन समिती" स्थापन करणे बाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक/एससीवाय-२०२५ /प्र.क्र.७५/म-७**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांकः- ०६ एप्रिल, २०२६

**संदर्भ:-**

१. महसूल व वनविभाग शा.नि.क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१७३/२०१७/म-७ दिनांक २७ मार्च २०१८

२. महसूल व वनविभाग शा.नि.क्र. एससीवाय २००४/प्र.क्र.२३/म-७ दिनांक ०५ जून २०२४

३. महसूल व वनविभाग शा.नि.क्र. कार्यशा-२०२५/प्र.क्र.०६/म-८ दिनांक ०९ एप्रिल २०२५

**प्रस्तावनाः-**

संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयान्वये दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ मध्ये विहीत करण्यात आलेल्या निर्देशांकाच्या आधारे राज्यामध्ये दुष्काळी परिस्थितीचे मुल्यांकन करून दुष्काळ जाहीर करण्यासाठी शास्त्रीय निकष व सुधारित कार्यपध्दती संदर्भाधीन शासन निर्णयान्वये विहित करण्यात आली आहे. सदर कार्यवाही करण्यासाठी जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय दुष्काळ देखरेख समित्या गठीत करण्यात आलेली आहे. त्यापैकी जिल्हास्तरीय दुष्काळ देखरेख समितीच्या रचनेमध्ये बदल करण्यात येवुन खरिप २०१८ च्या हंगामापासून पुनर्रचित जिल्हास्तरीय दुष्काळ देखरेख समिती स्थापन केली आहे.

संदर्भ क्र. २ अन्वये पशुधनासाठी आवश्यक असलेल्या चारा टंचाई बाबत दुष्काळग्रस्त भागातील जनावरांना आवश्यक असलेल्या चाऱ्याच्या प्रश्नावर मात करण्यासाठी राज्यातील खरीप हंगाम २०२३ करिता घोषित दुष्काळी तालुक्यात आवश्यकतेनुसार जनावरांना चारा उपलब्ध करुन देण्यासाठी चारा डेपो व्यवस्थापन जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे.

संदर्भ क्र. १ व २ वरील दोन्ही समित्यांचा उद्देश समान असून दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ अन्वये राज्यात दुष्काळ हाताळण्या संदर्भात वेगवेगळ्या शासन निर्णयानुसार दुष्काळ घोषित करणे, दुष्काळ देखरेख समिती, दुष्काळ निवारण समिती, चारा डेपो व्यवस्थापन समिती गठीत करण्यात आलेल्या आहेत. सदर समित्यांचा उद्देश दुष्काळ व्यवस्थापनाच्या कामकाज सुसुत्रीतपणे अधिक प्रभावीपणे व कमी वेळेत होणे हा आहे.

संदर्भ क्र. ३ वरील शासन निर्णय दिनांक ०९.०१.२०२५ नुसार स्थापन करण्यात आलेल्या अभ्यास समितीने केलेल्या शिफारशीनुसार सदर्भ क्र. १ व २ वरील अनुक्रमे 'जिल्हास्तरीय दुष्काळ देखरेख समिती' आणि 'चारा डेपो व्यवस्थापन जिल्हास्तरीय समिती' या दोन्ही समितीचे एकत्रिकरण करुन एकच समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय –**

दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ अन्वये राज्यात दुष्काळ हाताळण्या संदर्भात वेगवेगळ्या शासन निर्णयानुसार 'जिल्हास्तरीय दुष्काळ देखरेख समिती' आणि 'चारा डेपो व्यवस्थापन जिल्हास्तरीय समिती' गठीत करण्यात आलेल्या आहेत. सदर समित्यांचा उद्देश दुष्काळ व्यवस्थापन करण्यासाठी असल्याने सदर समित्यांचे कामकाज सुसुत्रीतपणे, अधिक प्रभावीपणे व कमी वेळेत होण्याच्या हेतूने संदर्भ क्र. १ व २ वरील शासन निर्णयान्वये अनुक्रमे 'जिल्हास्तरीय दुष्काळ देखरेख समिती' आणि 'चारा डेपो व्यवस्थापन जिल्हास्तरीय समिती' गठित दोन्ही समितींचे एकत्रिकरण करून नवीन 'जिल्हास्तरीय दुष्काळ व्यवस्थापन समिती' ही एकच समिती गठित करण्यात येत आहे व सदस्यांमध्ये चारा व्यवस्थापन कामाच्या अनुषंगाने वनविभागाचे जिल्हास्तरीय अधिकारी यांचा सदस्य म्हणुन समावेश करण्यात येत आहे. सदर समितीची उपरोक्त संदर्भ क्र. १ व २ चे शासन निर्णयातील कार्यकक्षा ही सारखीच असेल. नवीन जिल्हास्तरीय दुष्काळ व्यवस्थापन समिती'ची रचना ही खालील प्रमाणे राहील.

❖ जिल्हास्तरीय दुष्काळ व्यवस्थापन समिती.

| | | |
|---|---|---|
| १. | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सहअध्यक्ष |
| ३. | निवासी उपजिल्हाधिकारी | सदस्य सचिव |
| ४. | जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग | सदस्य |
| ५. | विभागीय वन अधिकारी/उपवनसंरक्षक अधिकारी (DCF) | सदस्य |
| ६. | उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय | सदस्य |
| ७. | अधिक्षक अभियंता, जलसंपदा | सदस्य |
| ८. | वरिष्ठ भूवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा | सदस्य |
| १०. | महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग अप्लीकेशन सेंटर, नागपूर या संस्थेतील तज्ञ व्यक्ती (आवश्यकतेनुसार) | निमंत्रित सदस्य |
| ११. | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी | सदस्य |
| १२. | समितीस आवश्यक वाटतील असे अन्य अधिकारी | निमंत्रित सदस्य |

उपरोक्त समितीच्या बदलाव्यतिरिक्त संदर्भीय शासन परीपत्रक व शासन निर्णयातील इतर बाबी कायम राहतील,

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०४०६१८४६४७५११९ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SNEHAL SANTOSH SAWANT

Digitally signed by SNEHAL SANTOSH SAWANT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=B35DC557BB39B4C779DBC7FABB797DEB54EFE31547ABCAF6A53497959D207A91, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=145C76C7B01294A3236E8066F60DC011E691193721BDB0B1D85AC27D7B50F8F1, cn=SNEHAL SANTOSH SAWANT
Date: 2026.04.06 18:48:14 +05'30'

**(स्नेहल सावंत)**

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,

२) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृह निर्माण, सार्वजनिक बांधकाम (सा.उ.) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई

४) मा. मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

५) मा. राज्यमंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

६) सर्व मा. मंत्री , यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

७) मा.राज्यमंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

८) सर्व सन्मानीय विधानसभा सदस्य

९) सर्व सन्मानीय विधानपरिषद सदस्य

१०) मा. मुख्य सचिव (महाराष्ट्र राज्य) यांचे स्विय सहायक, मंत्रालय, मुचई,

११) अपर मुख्य सचिव (महसूल), यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई,

१२) अपर मुख्य सचिव (नियोजन), मंत्रालय, मुंबई,

१३) विभागीय आयुक्त (सर्व),

१४) आयुक्त, सहकार

१५) जिल्हाधिकारी (सर्व)

१६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

१७) जिल्हा पोलीस अधिक्षक (सर्व)

१८) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

१९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,

२०) महालेखापाल (लेखा परिक्षा) १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,

२१) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,

२२) जिल्हा नियोजन अधिकारी (सर्व),

२३) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व),

२४) कार्यासन अधिकारी (ब-१), महसूल व वन विभाग मंत्रालय, मुंबई

२५) वित्त विभाग (कार्यासन व्यय-९/अर्थ-६), मंत्रालय, मुंबई

२६) नियोजन विभाग (कार्यासन १४८१) मंत्रालय, मुंबई

२७) निवड नस्ती (कार्यासन/म-७)